Maayboli Inc.
11 Fessenden Way
Lexington, MA, 02420
Tel: 781-477-9984

For Immediate Press Release

# मायबोली.कॉम ला २००७ चा बृहन महाराष्ट्र मंडळाचा सन्मान पुरस्कार.

(३० जून,२००७, बृहन महाराष्ट्र अधिवेशन, सिएॅटल, अमेरिका)

गेली दहा वर्षे मराठी समाज आणि संस्कृतीसाठी उत्तर अमेरिका आणि महाराष्ट्रात केलेल्या विशेष कार्याबद्दल , मायबोली.कॉम (www.maayboli.com) या अग्रगण्य मराठी संकेतस्थळाला या वर्षीचा बृहन महाराष्ट्र मंडळाचा सन्मान पुरस्कार देण्यात आला. मायबोलीचे मुख्य वित्त अधिकारी श्री समीर सरवटे यांनी मायबोलीकरांच्या वतीने अधिवेशनाचे प्रमुख वक्ते डॉ.श्री नरेंद्र जाधव यांच्याकडून तो स्वीकारला.

१६ सप्टेंबर, १९९६ रोजी सुरु झालेले मायबोली.कॉम हे सगळयात जुने मराठी संकेतस्थळ आहे. अजय आणि भावना गल्लेवाले यांनी वैयक्तिक वेबसाईट म्हणून सुरू केलेल्या या "छोट्याशा" संकेतस्थळावर आज सुमारे ८४ हजारापेक्षा जास्त पानांचा मजकूर आहे आणि सरासरी दर महिन्यात एक लाखाहून जास्त वेळा मराठी वाचक मायबोलीला भेट देतात. या दहा वर्षात मायबोलीने महाजालावर अनेक नवीन पायंडे पाडले. पहिली मराठी शुभेच्छापत्रे, दहा वर्षे २४ तास सतत सुरु असणारी मराठी अंताक्षरी, पहिली मराठी ऑनलाईन कादंबरी, आंतरजालावरचे मराठी माणसांचे खुले व्यासपीठ: हितगुज, जगभरच्या भाविकांनी एकत्र साजरा केलेला आंतरजालावरचा गणेशोत्सव, पहिला ऑनलाईन दिवाळी अंक, ऑनलाईन खरेदी/विक्री, मराठी व्यावसायिकांसाठी विनामूल्य छोट्या जाहिराती  असे अनेक उपक्रम आजही चालू आहेत. मायबोलीकर फक्त लेखनच करतात असे नाही तर वेगवेगळ्या वेळी प्रत्यक्ष भेटतात, सामाजिक उपक्रमात हातभार लावतात आणि सेवाभावी संस्थाची इतरानाही ओळख करुन देतात.

या सगळ्या यशामागे मायबोलीला वेळोवेळी मदत केलेल्या शेकडो स्वयंसेवकाचा मोठा हातभार आहे. संगणक आज्ञावली लेखन, स्वागत समिती, मदत समिती, नेमस्तक, दिवाळी अंक संपादक मंडळ, गणेशोत्सव समिती, वर्षाविहार समिती अशा विविध प्रकारे, १६ वर्षांपासून ते ८६ वर्षापर्यंत,  विविध वयाच्या स्वयंसेवकांनी मायबोलीवरचे आणि मराठी संस्कृतीवरचे आपलं प्रेम व्यक्त केले आहे.

मायबोली.कॉम चे मुख्य कार्यालय अमेरिकेत बॉस्टन, मॅसॅच्युसेटस इथे आहे.

###